महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-directorateofart@gmail.com


**क्रमांक:-डिओअे-२०२४/दोन/१३९७** **दिनांक:- १२ जून, २०२४**

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
शासकीय, शासमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/
कायम विनाअनुदानित कला परिसंस्था.

विषय:- कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत महत्वाच्या सुचना.

कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रियेची गुणवत्ता यादी दिनांक २८ जुन, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर प्रवेश यादीनुसार उमेदवारांच्या प्रवेशाच्या वेळी करावयाच्या कार्यावाहबाबत शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित कला परिसंस्था यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. विद्यार्थी/ कला परिसंस्थांनी प्रवेशापुर्वी कला संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रवेश प्रक्रियेबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनांचे अवलोकन करावे व त्याचे पालन करावे.
२. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळी आपल्यामार्फत कला संस्थेविषयी ऑनलाईन सादर केलेली माहिती (कला संस्थेचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, प्राचार्याचे नाव, प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी.)लॉगीन करुन पडताळणी करण्यात यावी. माहिती मध्ये काही बदल असल्यास योग्य तो बदल ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावा.
३. प्रत्येक कला परिसंस्थांचे लॉगीन आयडी, पासवर्ड मागील वर्षाचेच असतील. (शैक्षणिक वर्ष २०२३-२४)
४. ज्या कला संस्थांकडे लॉगीन आयडी, पासवर्ड उपलब्ध नाही, अशा संस्थांनी आपल्या कला परिसंस्थेच्या लेटर हेडवर लॉगीन आयडी व पासवर्डसाठी कला संचालकाच्या नांवे पत्र लिहून मागणी करावी. सदर पत्र technicalsupp101@gmail.com या ई-मेलवर पाठविण्यात यावे. तदनंतर आपणास लॉगीन आयडी व पासवर्ड टेक्निकल सपोर्ट कडून देण्यात येईल. ( टेक्निकल सपोर्ट भ्रमणध्वनी क्र. ७४००१ ८४८३० )
५. ज्या कला परिसंस्थांनी रजिस्ट्रेशन करुन आपल्या संस्थेविषयीची माहिती मागील वर्षी भरलेली नाही, तसेच त्यांच्याकडे लॉगीन आयडी, पासवर्ड उपलब्ध नाही, अशा संस्थांनीही वरील मुद्दा क्रमांक ४ मध्ये नमुद केलेली कार्यवाही करावी.
६. विद्यार्थी प्रवेशाकरिता कला परिसंस्था स्तरावर अधिष्ठाता/ प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली किमान ३ जेष्ठ अध्यापकांची
प्रवेश पुर्व तपासणी समिती गठीत करण्यात यावी.

७. कला संचालनालयामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या गुणवत्ता यादीमध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार संबंधित विद्यार्थ्यांकडून नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या प्रर्वगाची योग्य कागदपत्रे उपलब्ध असणे बंधनकारक आहे.

८. सदर गुणवत्ता यादी विद्यार्थ्यांना ऑनलाईन आवेदन पत्रामध्ये भरलेल्या गुणांच्या आधारे प्रसिध्द करण्यात आली आहे.

९. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आवेदन पत्रामध्ये सादर केलेल्या मूळ कागदपत्रांची संबंधित महाविद्यालयाच्या स्तरावरील समितीमार्फत पडताळणी करुनच प्रवेश देण्यात येतील.

१०. विद्यार्थ्यांनी आवेदन पत्रामध्ये भरलेले गुण व प्रत्यक्ष मूळ कागदपत्रांमधील गुण यामध्ये तफावत आढळल्यास सदर विद्यार्थ्याला गुणवत्ता यादीतून वगळण्यात येईल.

११. सदर गुणवत्ता यादी विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

१२. गुणवत्ता यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी उपरोक्त नमुद समितीने करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून निवड झाले आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र आवश्यक असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (SC व ST सोडून सर्व उमेदवारांकडे ) उपलबध असणे आवश्यक आहे.

१३. इतर राखीव प्रवर्गामधून निवड झालेल्या (उदा. Hill Area, MKB,Defense, Minority, NRI इ.) विद्यार्थ्यांकडे त्या त्या प्रंवर्गासाठीचे सर्व मुळ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४. समितीने वरीलप्रमाणे प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करुन, प्रमाणपत्रे परिपूर्ण असल्याशिवाय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करु नये. योग्य कागदपत्रांअभावी प्रवेश निश्चित करण्यात येवू नये. सर्व आवश्यक प्रमाणपत्रे परिपूर्ण असल्याशिवाय प्रवेश निश्चित केल्यास अथवा हा प्रवेश निरीक्षक कार्यालयाकडून रद्द झाल्यास अथवा यासंबंधी न्यायालयीन प्रकरणे उध्दभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कला परिसंस्थेची राहील, याची गांर्भियाने नोंद घ्यावी.

१५. संस्था स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीने प्रवेशासाठी निवड झालेल्या आणि उपस्थित होणा-या प्रत्येक उमेदवाराकडून संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला Scrutiny Form भरुन घेण्यात यावा. सदर Scrutiny Form सोबत सर्व मुळ कागदपत्रांची एक छायाप्रत घ्यावी. त्यानंतर उमेदवाराच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करुन उमेदवार पात्र/अपात्र (त्याच्या कारणासह) असल्याचा शेरा द्यावा. प्रत्येक उमेदवाराचा Scrutiny Form, Online Portal वर भरण्यात यावा. अशा प्रकारे कागदपत्र पडताळणीनंतर पात्र उमेदवारांचा Scrutiny Form कागदपत्रांच्या छायाप्रतींसह संस्थेच्या /महाविद्यालयाच्या कार्यालयात जतन करुन ठेवावे.

१६. आपल्या कला परिसंस्थेत प्रवेशासाठी येणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क अंतीम दिनांकापर्यंत नियोजित वेळेपर्यंत स्वीकारण्यात यावे.

१७. या प्रक्रियेत रुजू झालेल्या विद्यार्थी, रुजू न झालेल्या विध्यार्थी यांची माहिती online पद्धतीने सादर करण्याकरिता संगणक प्रणालीच्या वापराबाबतची कार्यप्रणाली सोबत जोडली आहे. महाविद्यालयांनी सदर संगणक प्रणालीमध्ये दिवसा अखेरीस आपल्या महाविद्यालयात आलेल्या उमेदवारांची माहिती व्यवस्थितपणे ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.

- संचालनालयाच्या http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळाच्यामुखपृष्टावरील प्रवेश/Admission अथवा https://doaonline.co.in/FA2024/ या लिंक येथे क्लिक करावे. त्यानंतर College Feedback Module (For Institute Only) अशी लिंक देण्यात आली असून सदर लिंक वर क्लिक करावे.
- कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांना Joined / Not Joined Status College Feedback Module मध्ये माहिती अद्ययावत करण्यापूर्वी आपल्या महाविद्यालयाची माहिती (पत्ता / दुरध्वनी क्र. इ.) अद्ययावत करणे आवश्यक आहे.
- त्यानंतर Login केल्यानंतर आपणास आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल.
- ज्या विद्यार्थ्यांचे "Joined / Not Joined करावयाचे आहे. अशा विद्यार्थ्याच्या नावासमोरील बटणावर क्लिक करावे व पुढील प्रक्रिया पूर्ण करावी.
- **आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अपलोड केलेले प्रमाणपत्र तपासावे व अपलोड नसलेले प्रमाणपत्र त्वरित अपलोड करावे.** सदर यादीमध्ये Joined / Not Joined माहिती भरण्यात यावी व अद्ययावत करण्यात यावी. त्याचप्रमाणे निवड झालेल्या विद्यार्थ्याकडे त्याच्या प्रवर्गाची प्रवेशासाठीची आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास College Feedback Module मध्ये Not Joined करून खालीलप्रमाणे Reason दर्शविण्यात यावे.

| Sr.No | Reason | Description |
|---|---|---|
| 1 | No Caste Certificate | No valid caste Certificate |
| 2 | No NCL | No valid Non-ceamy layer certificate |
| 3 | No ESW Certificate | No valid EWS certificate |
| 4 | Personal Reason | Candidate not willing to join |
| 5 | Not Reported | Candidate not report to college for joining within prescribe period given inschedule |
| 6 | No Minority Certificate | No valid minority certificate |
| 7 | Mismatched Category | Select wrong category at the time of registration |
| 8 | No PWD Certificate | No PWD certificate / PWD certificate show not eligible |
| 9 | No Ex-Servicemant Certificate | No Valid certificate |
| 10 | No Orphan Certificate | No valid orphan certificate |
| 11 | Invalid Gender | Select wrong gender at time of registration & allotted under women quota |

- विद्यार्थी प्रवेशास महाविद्यालयास उपस्थित न राहील्यास Not Reported असे Reason दिलेल्या वेळापत्रकानुसार शेवटच्या दिवशी दर्शविण्यात यावे.
- सदरची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर ती अचूक भरली आहे का, याची खात्री करुन घ्यावी. सदर माहितीमध्ये आपणास कोणाताही बदल करावयाचा असल्यास Edit म्हणून पर्याय आपणास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर माहिती व्यवस्थितरित्या भरणा केली आहे याची खात्री केल्यानंतर वेळापत्रकानुसार अखेरच्या दिवशी सदर माहितीचा अहवाल “Generate Repprt” बटणवर क्लिक करावे. Generate झालेल्या अहवालाच्या प्रत्येक पानावर अधिष्ठाता/प्राचार्य यांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा मुद्रांक “ College Stamp” घेण्यात यावा.

- सदर माहिती भरण्यास अडचण होत असेल तर ७४००१८४८३० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. सदरील दुरध्वनी क्रमांक कोणत्याही उमेदवारास देऊ नये.
- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश प्रक्रिया संपूर्ण ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. प्रत्येक कला परिसंस्थेने प्रवेशाची प्रक्रिया ऑनलाईन व उक्त माहितीच्या आधारे कला परिसंस्थेच्या प्राचार्यांनी करावयाची आहे.
- ज्या कला परिसंस्थेचे प्राचार्य उक्त सूचनांचे व प्रवेशाच्या वेळापत्रकाचे पालन करणार नाहीत, त्या कला परिसंस्थेचे प्रवेश ग्राह्य धरले जाणार नाही, याची नोंद घ्यावी आणि याला संपुर्णत: कला परिसंस्थेचे प्राचार्य जबाबदार असतील.

उपरोक्त सुचनांची प्राधान्याने व कटाक्षाने पालन करण्यास आपल्याला आदेशीत करण्यात येत आहेत.

(राजीव मिश्रा)
प्र.कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.